# महाराष्ट्र विधानसभा
# विधानसभा आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# सहावा अहवाल

[सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील
आश्वासनांसंबंधीचा अहवाल]

एचबी-२०४४-१

Scanned by CamScanner

# विधानसभा आश्वासन समिती

## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

• (१) श्री. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख.

सदस्य :

(२) श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

(४) श्री. धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.

(५) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.

(६) श्री. लक्ष्मण पवार, वि.स.स

(७) श्री. विलासराव जगताप, वि.स.स.

(८) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(९) श्री. समीर मेघे, वि.स.स.

(१०) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(११) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.

(१२) श्री. रणजित कांबळे, वि.स.स

(१३) श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.

(१४) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१५) श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१६) श्री. अवधूत तटकरे, वि.स.स.

१७) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.

(१८) श्री. विलास तरे, वि.स.स.

(१९) रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(३) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

(५) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

(६) श्री. सुरेश मोगल, कक्ष अधिकारी.

• विधानसभा आश्वासन समितीचे समिती प्रमुख श्री. गुलाबराव पाटील, यांची शुक्रवार, दिनांक ८ जून, २०१६ रोजी राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या त्यांचे जागी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर,२०१६ रोजी कार्यकारी समिती प्रमुख म्हणून नामनियुक्ती केली आहे.

Scanned by CamScanner

# विधानसभा आश्वासन समिती
## (२०१३-२०१४)

**समिती प्रमुख :**

१. श्री. नवाब मलिक, वि.स.स तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्री. विलासराव (काका) पाटील , वि.स.स.

३. श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

४. श्री. रामप्रसाद कदम - बोर्डीकर, वि.स.स.

५. श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

६. श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स.

७. श्री. विलास तरे, वि.स.स.

८. श्री. किसन कथोरे, वि.स.स.

९. श्री. दिलीप मोहिते, वि.स.स.

१०. श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील, वि.स.स.

११. श्रीमती संध्यादेवी देसाई उर्फ कुपेकर, वि.स.स.

१२. श्री. प्रकाश मेहता, वि.स.स.

१३. श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

१४. श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

१५. श्री. राजन साळवी, वि.स.स.

१६. प्रा. शरद पाटील, वि.स.स.

१७. डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.

१८. श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

१९. श्री. मुफ्ती मोहम्मद ईस्माईल अ. खलिक, वि.स.स.

**निमंत्रित :**

• २०. श्री. विजय घोडमारे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी.

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

(४) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

• विधानसभा आश्वासन समितीवर मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ नोव्हेंबर,२०१३ रोजीपासून श्री. विजय घोडमारे, वि.स.स. यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स. यांची मंत्रीमंडळात नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या त्यांचे जागी श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स यांची समिती सदस्य म्हणून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी नामनियुक्ती केली आहे.

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठक्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १. | विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या | १ |
| २. | विवरणपत्रे विधानसभेस सादर होण्यास झालेला विलंब | २ |
| ३. | सन १९९१ पासून ते सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वर्षनिहाय व विभागनिहाय आश्वासनांची प्रलंबित यादी. | २ |
| ४. | अभिप्राय व शिफारशी | ७ |
| | **परिशिष्टे :** | |
| | **परिशिष्ट-एक** - आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | ११ |
| | **परिशिष्ट-दोन** -आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके | २७ |
| | **परिशिष्ट-तीन** - आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण | ५६ |
| | **परिशिष्ट-चार-** समितीच्या बैठकांचे कार्यवृत्त | ६१ |


Scanned by CamScanner

## प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा **सहावा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे. सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधान सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू **सहावा अहवाल** तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/ परिपत्रके परिशिष्ट "दोन" मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट "तीन" मध्ये देण्यात आले आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट "चार" मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत विचार करुन तो संमत करण्यात आला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ६ डिसेंबर, २०१६.

**जयप्रकाश मुंदडा,**
कार्यकारी समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती.

Scanned by CamScanner

## अहवाल

### सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित ३७ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या.**

| अ. क्र. (१) | आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक (२) | आश्वासन क्रमांक (३) | आश्वासन संख्या (४) |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १२ जून २०१४ | १,६,२४,३७,३९,४०,४४ | ०७ |
| २ | दिनांक १८ डिसेंबर २०१४ | २,४,९,१५,२०,२१,२२,२३,२५,२६, २८,३६,४१,४३,४५,५४,५५,५६ | १८ |
| ३ | दिनांक ७ एप्रिल २०१५ | ५,७,१८,३० | ०४ |
| ४ | दिनांक २१ जुलै २०१५ | १४ | ०१ |
| ५ | दिनांक १४ डिसेंबर २०१५ | १२,१६,३१ | ०३ |
| | | | एकूण :- ३३ |
| ६ | दिनांक २१ जुलै २०१६ | • सार्वजनिक बांधकाम विभागाचे आश्वासन क्र. २९ व सामान्य प्रशासन विभाग आश्वासन क्र. ३५ हे आश्वासन विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी प्रलंबित = एकूण आश्वासने ०२. | ०२ |
| ७ | दिनांक २६ जुलै, २०१६ | • पटलावर ठेवलेली परंतु समितीच्या विचार विनियमासाठी ( वाचनासाठी ) प्रलंबित असलेली आश्वासन क्रमांक ४६,४७ = एकूण आश्वासने ०२. | ०२ |
| | | | एकूण - ३७ |



Scanned by CamScanner

## विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब.

सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ५७ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांकनिहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, (१) १८ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ६ महिने १७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, (२) ०४ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १० महिने ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. (३) ०१ आश्वासनावरील विवरणपत्र पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष १ महिना, २० दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. (४) ०३ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष, ६ महिने, १३ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. अद्याप २० आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :—

### प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

| अ. क्र. (१) | विभागाचे नांव (२) | आश्वासन क्रमांक (३) | आश्वासनांची एकूण संख्या (४) |
|---|---|---|---|
| १ | महसूल व वन विभाग | ३,२७,३३ | ०३ |
| २ | महिला व बालविकास विभाग | ८ | ०१ |
| ३ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | १०,११,१३ | ०३ |
| ४ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १७ | ०१ |
| ५ | गृह विभाग | १९,३४ | ०२ |
| ६ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | ३२ | ०१ |
| ७ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ३८,४२ | ०२ |
| ८ | नगरविकास विभाग | ४८,४९,५०,५१,५२,५३,५७ | ०७ |
| | | एकूण | २० |

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबंधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या "कार्यवाहीचे विवरण" जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंतर्भूत करण्याचे समितीने ठरविले आहे. **"कार्यवाहीचे विवरणपत्र तात्काळ सादर करण्यात यावे"** असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

Scanned by CamScanner

(२)

संसदीय कार्य विभाग/सहा

## विधानसभा

### सन २०१६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंत दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या आश्वासनांची विभागनिहाय यादी

| अ. क्र. | विभागाचे नाव | सन १९९१ ते सन २००० पर्यंतची प्रलंबित आश्वासने | सन २००१ ते सन २०१६ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनाच्या प्रारंभापर्यंतची प्रलंबित आश्वासने | एकूण प्रलंबित आश्वासने |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | महसूल व वन विभाग .. | ०८ | ५८१ | ५८९ |
| २ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग .. | निरंक | १६४ | १६४ |
| ३ | नगरविकास विभाग .. | १३ | ७८४ | ७९७ |
| ४ | सार्वजनिक आरोग्य विभाग .. | निरंक | २४५ | २४५ |
| ५ | गृह विभाग .. | निरंक | ३३३ | ३३३ |
| ६ | सामाजिक न्याय व वि. स. विभाग .. | निरंक | १३१ | १३१ |
| ७ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग .. | निरंक | २८१ | २८१ |
| ८ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग .. | निरंक | २१७ | २१७ |
| ९ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग .. | निरंक | २७ | २७ |
| १० | जलसंपदा विभाग .. | निरंक | १०६ | १०६ |
| ११ | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग .. | निरंक | १०२ | १०२ |
| १२ | कृषी व पदुम विभाग .. | निरंक | १०० | १०० |
| १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग .. | निरंक | १२४ | १२४ |
| १४ | गृहनिर्माण विभाग .. | निरंक | ११६ | ११६ |
| १५ | महिला व बालविकास विभाग .. | निरंक | २३ | २३ |
| १६ | सहकार व वस्त्रोद्योग विभाग .. | निरंक | ९८ | ९८ |
| १७ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग .. | निरंक | १०९ | १०९ |
| १८ | सामान्य प्रशासन विभाग .. | निरंक | २३ | २३ |
| १९ | आदिवासी विकास विभाग .. | निरंक | ९७ | ९७ |
| २० | नियोजन विभाग .. | निरंक | ५७ | ५७ |
| २१ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | निरंक | ४१ | ४१ |
| २२ | विधि व न्याय विभाग .. | निरंक | १९ | १९ |
| २३ | वित्त विभाग .. | निरंक | ०५ | ०५ |
| २४ | पर्यावरण विभाग .. | निरंक | २८ | २८ |
| २५ | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग .. | निरंक | १८ | १८ |
| २६ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग .. | निरंक | २१ | २१ |
| २७ | अल्पसंख्यांक विभाग .. | निरंक | २० | २० |
| २८ | मराठी भाषा विभाग .. | निरंक | निरंक | निरंक |
| २८ | संसदीय कार्य विभाग .. | निरंक | ०१ | ०१ |
| | **एकूण** .. | **२१** | **३८७१** | **३८९२** |

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र विधानसभा

## प्रलंबित आश्वासनांची वर्षनिहाय व अधिवेशननिहाय यादी

### सन २०१६ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात आश्वासनपूर्ततेची विवरणपत्रे पटलावर ठेवल्यानंतरची स्थिती

| वर्ष (१) | अधिवेशन (२) | दिलेली आश्वासने (३) | एकूण (४) | निकाली आश्वासने (५) | एकूण (६) | प्रलंबित आश्वासने (७) | एकूण (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९१ | पहिले | ४७२ | | ४७० | | २ | |
| | दुसरे | ५८४ | | ५८४ | | ० | |
| | तिसरे | ३८२ | | ३८२ | | ० | |
| | | | १४३८ | | १४३६ | | ०२ |
| १९९२ | पहिले | ५६८ | | ५६८ | | ० | |
| | दुसरे | ४३३ | | ४३३ | | ० | |
| | तिसरे | १७३ | | १७३ | | ० | |
| | | | ११७४ | | ११७४ | | ० |
| १९९३ | पहिले | ८४७ | | ८४६ | | १ | |
| | दुसरे | ५४३ | | ५४२ | | १ | |
| | तिसरे | ६९० | | ६८७ | | ३ | |
| | | | २०८० | | २०७५ | | ५ |
| १९९४ | पहिले | १४७७ | | १४७६ | | १ | |
| | दुसरे | ९१५ | | ९१४ | | १ | |
| | तिसरे | ४४५ | | ४४४ | | १ | |
| | | | २८३७ | | २८३४ | | ३ |
| १९९५ | पहिले | २८२ | | २८२ | | ० | |
| | दुसरे | ११८९ | | ११८८ | | १ | |
| | तिसरे | ९९४ | | ९९४ | | ० | |
| | | | २४६५ | | २४६४ | | १ |
| १९९६ | पहिले | ४१२ | | ४११ | | १ | |
| | दुसरे | ७०४ | | ७०३ | | १ | |
| | तिसरे | ४७७ | | ४७७ | | ० | |
| | | | १५९३ | | १५९१ | | २ |
| १९९७ | पहिले | ४८६ | | ४८६ | | ० | |
| | दुसरे | १४८ | | १४८ | | ० | |
| | तिसरे | २८० | | २७७ | | ३ | |
| | | | ९१४ | | ९११ | | ३ |
| १९९८ | पहिले | ६२६ | | ६२६ | | ० | |
| | दुसरे | २६९ | | २६९ | | ० | |
| | तिसरे | ३०६ | | ३०६ | | ० | |
| | | | १२०१ | | १२०१ | | ० |
| १९९९ | दुसरे | ५३५ | | ५३४ | | १ | |
| | चौथे | ५०८ | | ५०६ | | २ | |
| | | | १०४३ | | १०४० | | ३ |

Scanned by CamScanner

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००० | पहिले | ९६५ | | ९६४ | | १ | |
| | दुसरे | १८० | | १८० | | ० | |
| | तिसरे | २६२ | | २६१ | | १ | |
| | | | १४०७ | | १४०५ | | २ |
| २००१ | पहिले | ३०९ | | ३०९ | | ० | |
| | दुसरे | ३४५ | | ३४४ | | १ | |
| | तिसरे | २७४ | | २७४ | | ० | |
| | | | ९२८ | | ९२७ | | १ |
| २००२ | पहिले | ५१९ | | ५१५ | | ४ | |
| | तिसरे | ३४२ | | ३३९ | | ३ | |
| | चौथे | ४१९ | | ४१७ | | २ | |
| | | | १२८० | | १२७१ | | ९ |
| २००३ | दुसरे | ६८९ | | ६८१ | | ८ | |
| | चौथे | ७३६ | | ७२५ | | ११ | |
| | पाचवे | ७०१ | | ७०० | | १ | |
| | | | २१२६ | | २१०६ | | २० |
| २००४ | पहिले | ४१ | | ३९ | | २ | |
| | दुसरे | ६४१ | | ६३० | | ११ | |
| | चौथे | ५२२ | | ५१४ | | ८ | |
| | | | १२०४ | | ११८३ | | २१ |
| २००५ | पहिले | १३५७ | | १३५२ | | ५ | |
| | दुसरे | ११३५ | | ११२६ | | ९ | |
| | तिसरे | ७१३ | | ७११ | | २ | |
| | | | ३२०५ | | ३१८९ | | १६ |
| २००६ | पहिले | १३०४ | | १२८२ | | २२ | |
| | दुसरे | ६७३ | | ६६२ | | ११ | |
| | तिसरे | ९०४ | | ८९१ | | १३ | |
| | | | २८८१ | | २८३५ | | ४६ |
| २००७ | पहिले | १३८९ | | १३७२ | | १७ | |
| | दुसरे | ७५७ | | ७४४ | | १३ | |
| | तिसरे | ५३३ | | ५२० | | १३ | |
| | | | २६७९ | | २६३६ | | ४३ |
| २००८ | पहिले | ९८३ | | ९५८ | | २५ | |
| | दुसरे | १७७ | | १७६ | | १ | |
| | तिसरे | ३५३ | | ३३८ | | १५ | |
| | | | १५१३ | | १४७२ | | ४१ |

Scanned by CamScanner

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००९ | पहिले | २२ | | २१ | | १ | |
| | दुसरे | ४८४ | | ४७३ | | ११ | |
| | तिसरे | १ | | १ | | ० | |
| | चौथे | ३१९ | | ३१२ | | ७ | |
| | | | ८२६ | | ८०७ | | १९ |
| २०१० | पहिले | १३२५ | | १२६७ | | ५८ | |
| | दुसरे | ५८० | | ५४३ | | ३७ | |
| | तिसरे | ५८२ | | ५३४ | | ४८ | |
| | | | २४८७ | | २३४४ | | १४३ |
| २०११ | पहिले | ९८१ | | ९२० | | ६१ | |
| | दुसरे | ३४१ | | ३२६ | | १५ | |
| | तिसरे | २३४ | | २१७ | | १७ | |
| | | | १५५६ | | १४६३ | | ९३ |
| २०१२ | पहिले | ८६१ | | ७८६ | | ७५ | |
| | दुसरे | ४९५ | | ४४१ | | ५४ | |
| | तिसरे | ४२२ | | ३८५ | | ३७ | |
| | | | १७७८ | | १६१२ | | १६६ |
| २०१३ | पहिले | ५५७ | | ४८९ | | ६८ | |
| | दुसरे | ४५१ | | ३४४ | | १०७ | |
| | तिसरे | ३८८ | | २९९ | | ८९ | |
| | | | १३९६ | | ११३२ | | २६४ |
| २०१४ | पहिले | ५७ | | ३७ | | २० | |
| | दुसरे | ४६० | | ३१३ | | १४७ | |
| | तिसरे (विशेष) | ७ | | ५ | | २ | |
| | चौथे (हिवाळी) | ८२२ | | ५१२ | | ३१० | |
| | | | १३४६ | | ८६७ | | ४७९ |
| २०१५ | पहिले | ११८९ | | ६९४ | | ४९५ | |
| | दुसरे | ६७४ | | ३१७ | | ३५७ | |
| | तिसरे | ६५८ | | १७३ | | ४८५ | |
| | | | २५२१ | | ११८४ | | १३३७ |
| २०१६ | पहिले | ११८८ | ११८८ | १५ | १५ | ११७३ | ११७३ |
| | **एकूण** | | **४५०६६** | | **४११७४** | | **३८९२** |

Scanned by CamScanner

## अभिप्राय व शिफारशी

विधानसभा सभागृहात मा.सदस्यांद्वारा विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनांच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असलेल्या बाबी समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारा वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणाऱ्या आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रूपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढ्यापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वंकष कार्यवाही करून त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि, अधिकाऱ्यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करून त्या संदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करून आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुद्ध ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव/ प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव/ सह सचिव यांचे समवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबत आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने/ अभिवचने संदर्भात जी आश्वासने/ अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या ५७ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे ऑगस्ट, २०१४ ते मार्च, २०१६ या कालावधीत विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली. या ५७ आश्वासनांपैकी समितीने ३३ आश्वासनांचे वाचन करून त्यावर निर्णय घेतला, २ आश्वासने ही समितीच्या विचारविनिमयासाठी (वाचनांसाठी) प्रलंबित आहेत. २ आश्वासने साक्षीसाठी प्रलंबित आहेत आणि सुमारे २० आश्वासने विभागाकडे प्रलंबित आहेत. शासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

मा. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेवून कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. या बाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणाऱ्या आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांवर चर्चा उपस्थित करून संबंधित मंत्रीमहोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयांच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

Scanned by CamScanner

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतुदीस अनुसरून आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणाऱ्या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आलेला आहे. या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची/ अभिवचनांची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा आश्वासनांची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आश्वासीत केलेली आश्वासने प्रस्तावित करून त्यावर निर्णय घेऊन त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांची पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत. विधानसभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालून दिलेली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांशी आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहुना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे विलंबाने करणाऱ्या संबंधित विभागाच्या उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात त्या संदर्भात नस्ती प्रस्तावित करून आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करून व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन या संदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

सन १९९१ ते सन २०१६ या कालावधीतील एकूण आश्वासनांची संख्या ४५,०६६ इतकी आहे. त्यापैकी आतापर्यंत शासनाने ४१,१७४ इतकी आश्वासने निकाली काढली आहेत आणि प्रलंबित आश्वासनांची संख्या ३,८९२ इतकी आहे.

वरीलप्रमाणे प्रलंबित आश्वासनांची संख्या विचारात घेता ती मोठ्या प्रमाणावर आहे. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करून ती सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करून त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनाच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित सॉफ्ट कॉपीमध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवेळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह सादर करावी. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेली आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारून नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी विवरणपत्रात आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापुढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा. मंत्रीमहोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करूनच समितीकडे परिसृत करावीत व या संदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करून त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

Scanned by CamScanner

**विशेष शिफारस**

समितीस असेही निदर्शनास आले की, विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी संबंधित विभागीय सचिव/प्रधान सचिव अनेकदा या-ना-त्या कारणावरून समीती समोर साक्ष देण्यास अनुपस्थित असतात किंवा उपलब्ध होत नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या ऐवजी संबंधित विभागाचे सह सचिव/उप सचिव दर्जाचे अधिकारी/अवर सचिव दर्जाचे अधिकाऱ्यांना साक्षीसाठी हजर राहण्यासाठी सांगितले जाते. असे अधिकारी समितीसमोर साक्ष देत असताना पूर्णपणे माहिती घेऊन न येणे, समिती समोर यथायोग्य उत्तर देत नसल्याने शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची माहिती देण्यास असमर्थ असणे, समितीचे कामकाजात त्यांच्याकडून अपेक्षित असे कामकाज होत नसणे, चुकीची माहिती समिती समोर सादर करणे, इत्यादी बाबी आढळून आल्या आहेत. त्यामुळे अनेक वेळा समितीला निर्णयाविना बैठक पुढे ढकलावी लागते. त्यामुळे समितीच्या वेळेचा अपव्यय होत असून समितीला पुढील संबंधित विषयावर वेळीच निर्णय घेणे शक्य होत नाही. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

यापूर्वीही अनेक वेळा शासनाच्या अनेक विभागांच्या संबंधित सचिवांनी समितीसमोर साक्षीसाठी उपलब्ध होऊ शकत नाहीत असे कळविले आहे. या संदर्भात मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना विधानमंडळांच्या समित्यांनी कठोर शब्दात समज दिलेली आहे असे असताना देखील संबंधित विभागाच्या सचिवांद्वारे याबाबत विधानमंडळ समित्यांच्या निदेशांचे पालन केले जात नाही. त्यामुळे शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या या भूमिकेचे समिती कठोर शब्दात नापसंती व्यक्त करते. कारण संसदीय लोकशाहीमध्ये समित्यांचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता राज्य शासनाचे अधिकारी समितीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास बांधिल असताना त्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीच्या कामकाजासंदर्भात यथायोग्य उत्तरे देऊन समितीच्या कामकाजात सहकार्य करणे आवश्यक आहे.

समिती समोर अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या विभागाचे सचिव, प्रधान सचिव अनुपस्थित राहणार असतील तर समितीला कमीत कमी तीन दिवस अगोदर अथवा समितीचे पत्र गेल्याबरोबर देखील मा. समिती प्रमुखांना अथवा समितीच्या सचिवांना कळविणे आवश्यक असते. परंतु याची सर्व संबंधित विभाग दखल सुध्दा घेत नाहीत. ही बाब देखील तेवढीच गंभीर आहे. जर समितीच्या कामकाजात काही अपरिहार्य कारणामुळे संबंधित विभागाचे प्रधान सचिव/सचिव उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी तसे समितीला कळविणे आवश्यक आहे. तथापि, बहुतांश अधिकारी बैठकीच्या ऐनवेळी समितीस कळवून त्यांचेऐवजी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या अधिकाऱ्यांना (सह सचिव/उप सचिव) समिती समोर उपस्थित राहण्यास व त्यांची अनुपस्थिती मान्य करण्याची विनंती केली जाते. त्यामुळे समितीला ऐनवेळी बैठक स्थगीत करावी लागते. अशाने समितीपुढील प्रलंबित कामांची संख्या वाढते. म्हणून हे सर्व टाळण्यासाठी विभागाच्या प्रधान सचिव/सचिव यांनी बैठकीस उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक आहे.

. . . . .



Scanned by CamScanner